आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
११ फेब्रुवारी २०२५ मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्यासह कृत्रिम बुद्धिमत्ता कृती शिखर परिषदेचं सहअध्यक्षपद भूषवणार

- भारत ऊर्जा सप्ताहाचं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते दूरस्थ पद्धतीने उद्घाटन

- राज्यात दिव्यांग व्यक्तींच्या कल्याण आणि सक्षमीकरणाकरिता जिल्हा वार्षिक योजनेत एक टक्का निधी राखीव ठेवण्यात येणार

- ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राला पदक तालिकेत दुसरं स्थान

**आणि**

- ज्येष्ठ साहित्यिक रा रं बोराडे यांचं निधन

**<><><><><><>**

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरातून नवसंशोधन आणि त्याचं नियमन यावर जागतिक पातळीवर चर्चा करण्याची गरज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली. पॅरिसमध्ये आयोजित कृत्रिम बुद्धिमत्ता कृती शिखर परिषदेत सहअध्यक्षपदावरुन ते बोलत होते. कृत्रिम बुद्धिमत्तेचे चांगले उपयोग खूप आहेत. मात्र त्याचवेळी त्यातून होणाऱ्या दुजाभावावर लक्ष देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन या परिषदेत सहअध्यक्ष झाले आहेत. या दौऱ्यात प्रधानमंत्री मोदी भारत-फ्रान्स द्विपक्षीय संबंध मजबूत करण्याच्या उद्देशाने फ्रान्सच्या अध्यक्षांबरोबर चर्चा करणार आहेत. फ्रान्समधल्या ऐतिहासिक मार्सेली शहराला प्रधानमंत्री भेट देणार असून तिथल्या पहिल्या भारतीय वाणिज्य दूतावासाचं उद्घाटन त्यांच्या हस्ते होणार आहे. त्याशिवाय उभय देशांचा संयुक्त प्रकल्प असलेल्या थर्मोन्युक्लिअर एक्सपरिमेंटर रिॲक्टर प्रकल्पाला ते भेट देतील. तसंच पहिल्या आणि दुसऱ्या

महायुद्धात धारातीर्थी पडलेल्या भारतीय सैनिकांना मजारग्यूज युद्ध स्मशानभूमीत श्रद्धांजली अर्पण करतील. फ्रान्सचा दौरा आटोपून प्रधानमंत्री बुधवारी दोन दिवसांच्या अमेरिका दौऱ्यावर रवाना होणार आहेत.

**<><><><><>**

देशाची सौर ऊर्जा निर्मिती क्षमता ३२ पटीने तसंच  जीवाश्मेतर इंधन निर्मिती क्षमता तिप्पट वाढल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सांगितलं. द्वारका इथं आजपासून सुरू झालेल्या भारत ऊर्जा सप्ताहाचं प्रधानमंत्र्यांनी आज दूरदृश्यप्रणालीद्वारे उद्घाटन केलं, त्यावेळी ते बोलत होते. पॅरीस  जी-२० कराराचं उद्दिष्ट साध्य करणारा भारत पहिला देश असल्याचंही ते म्हणाले. गेल्या दशकभरात भारताच्या अर्थव्यवस्थेने दहाव्या स्थानावरून पाचव्या स्थानावर झेप घेतली असंही प्रधानमंत्री म्हणाले. जगभरातले देश भारताचा गौरव करत असल्याचं प्रधानमंत्री मोदी म्हणाले….

**होल्ड बाईट मोदी**

**<><><><><>**

सायबर गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी केंद्र सरकार चौफेर प्रयत्न करत असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज सांगितलं. नवी दिल्ली इथे सायबर सुरक्षा आणि सायबर गुन्हे या विषयावर गृहमंत्रालयाच्या संसदीय सल्लागार समितीच्या बैठकीत ते बोलत होते. सायबर गुन्ह्यांनी भौगोलिक सीमा पुसून टाकल्या असून त्यांना आळा घालण्यासाठी केंद्र सरकार अभिसरण, समन्वय, संवाद आणि क्षमता यांच्यावर भर देत असल्याचं शहा यावेळी म्हणाले. सायबर गुन्हे रोखण्यासाठीच्या हेल्पलाईन क्रमांक १९३० या क्रमांकाविषयी जनजागृती करण्याचं आवाहन त्यांनी यावेळी समितीच्या सदस्यांना केलं.

**<><><><><>**

पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या पुण्यतिथी निमित्त आज देशभरातून त्यांना आदरांजली वाहिली जात आहे. गृहमंत्री अमित शहा, भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जगत प्रकाश नड्डा आणि इतर नेत्यांनीही आज नवी दिल्लीत पक्ष मुख्यालयात त्यांना श्रद्धांजली वाहिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंडित दीनदयाळ उपाध्याय यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

**<><><><><><>**

डिजिटायजेशन याचा अर्थ नियंत्रण हटवणं असा घेऊन या दोन संकल्पनांमध्ये गल्लत होत असल्याचं निरीक्षण मुख्य आर्थिक सल्लागार व्ही. अनंत नागेश्वरन यांनी नोंदवलं आहे. ‘आयव्हीसीए’ या संस्थेच्या कार्यक्रमात ते आज मुंबईत बोलत होते. ऑनलाइन किंवा ऑफलाइन, दोन्ही ठिकाणी अनावश्यक नियमन दूर करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. जागतिक आर्थिक परिस्थितीचा विचार करा महागाई नियंत्रणात ठेवणं जास्त कठीण असेल, मात्र भारताने जर महागाई दर ३ ते ४ टक्क्यांवर आणला, तर रुपयाचं अवमूल्यन थांबवणं शक्य होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**<><><><><><>**

प्रसारभारतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी यांनी आज मुंबईत दूरदर्शन आणि आकाशवाणीच्या कामकाजाचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी सर्व विभागांची माहिती जाणून घेतली आणि अधिकाधिक लोकाभिमुख होण्यासाठी विभागप्रमुखांना सूचना दिल्या. मे महिन्यात १ ते ४ तारखेदरम्यान होणाऱ्या waves परिषदेच्या तयारीचाही आढावा त्यांनी यावेळी घेतला.

**<><><><><><>**

येत्या आर्थिक वर्षापासून दिव्यांग व्यक्तींच्या कल्याण आणि सक्षमीकरणाकरता जिल्हा वार्षिक योजनेतून एक टक्का निधी राखीव ठेवण्याचे

आदेश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहेत. यासंदर्भातला शासन आदेश काल जारी झाला. या निधीच्या योग्य विनियोग होण्यासाठी सुस्पष्ट आदेश लवकरच नियोजन विभाग, वित्त विभागाच्या मान्यतेने दिव्यांग कल्याण विभाग निर्गमित करेल, असंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

महाराष्ट्रात राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीनं घेण्यात येणाऱ्या इयत्ता बारावीच्या परीक्षेला आजपासून राज्यभरात सुरुवात झाली. या परीक्षेसाठी १५ लाख ५ हजार ३७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असल्याची माहिती मंडळानं दिली आहे. राज्यभरात ३ हजार ३७३ मुख्य केंद्रावर परीक्षा होणार आहे. परीक्षा काळात संभाव्य गैरप्रकारांना आळा बसावा, या दृष्टीने मंडळानं २७१ भरारी पथकांची नेमणूक केली आहे. परीक्षेदरम्यान कॉपीमुक्त अभियान राबवण्यात येणार आहे. या अंतर्गत संवेदनशील परीक्षा केंद्रांवर ड्रोन कॅमेऱ्यानं निगराणी ठेवली आहे.

**<><><><><>**

राज्य विधीमंडळात प्रथमच निवडून आलेल्या सदस्यांसाठी नवी दिल्लीत संसद परिसरात विधिमंडळ कार्यपद्धती प्रशिक्षण कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे; या कार्यक्रमाचं उद्घाटन काल लोकसभेचे सभापती ओम बिरला यांच्या हस्ते झालं. राज्य विधीमंडळाच्या सदस्यांनी शून्य तास, प्रश्नोत्तर तास यांसारख्या संसदीय प्रक्रिया प्रभावीपणे वापराव्यात आणि सभागृहात सक्रिय सहभाग घ्यावा, असं आवाहन बिर्ला यांनी यावेळी केलं. या प्रशिक्षणाचा समारोप आज महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या उपस्थितीत होणार आहे.

**<><><><><>**

सोयाबीन खरेदीसाठी केंद्र सरकारने कोणतीही मुदतवाढ दिलेली नसल्याचं राज्याच्या पणन विभागानं स्पष्ट केलं आहे. महाराष्ट्रात हमीभावाने सोयाबीन खरेदीसाठी आधी १३ जानेवारीपर्यंत मुदत होती; ती संपल्यानंतर केंद्र शासनाने २४ दिवसांची म्हणजे दिनांक ६ फेब्रुवारी पर्यंत मुदतवाढ दिली होती. मात्र महाराष्ट्रात सोयाबीन खरेदीला मुदतवाढ दिल्याचं वृत्त काही माध्यमांमधून देण्यात आलं होतं; त्यावर ६ फेब्रुवारीनंतर कोणतीही मुदतवाढ दिलेली नाही, असं पणन विभागानं स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

उत्तराखंडमध्ये सुरू असलेल्या ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राने पदक तालिकेत दुसरं स्थान पटकावलं आहे. महाराष्ट्राकडे सध्या सर्वाधिक १२९ पदकं असून यात ३३ सुवर्ण, ४८ रौप्य आणि ४८ कांस्य पदकांचा समावेश आहे. सेनादलं ४९ सुवर्ण पदकांसह पहिल्या स्थानावर असून कर्नाटक ३२ सुवर्णपदकांसह तिसऱ्या स्थानावर आहे.

**<><><><><>**

ज्येष्ठ साहित्यिक प्राचार्य रा रं बोराडे यांचं आज छत्रपती संभाजीनगर इथं वार्धक्याने निधन झालं, ते ८५ वर्षांचे होते. त्यांच्यावर गेले काही दिवस रुग्णालयात उपचार सुरु होते.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात वैजापूर इथल्या महाविद्यालयात प्राध्यापक आणि नंतर परभणी इथल्या शिवाजी महाविद्यालयात प्राचार्य पदाची जबाबदारी सांभाळणारे बोराडे यांचा ‘पेरणी’ हा पहिला कथासंग्रह १९६२ साली पुण्याच्या कॉन्टिनेन्टल प्रकाशनाने प्रसिद्ध केला होता. त्यांची ‘पाचोळा’ ही कादंबरी विशेष गाजली. याशिवाय ‘तलफ’, ‘बुरूज’, यांसारख्या अत्यंत वेगळ्या धाटणीच्या कथाही त्यांनी लिहिल्या होत्या. ग्रामीण भागातल्या गरीब सर्वसामान्य माणसाला त्यांनी

आपल्या कथांमधून जिवंत केलं. त्यांच्या कथांमधली पात्रं ठसठशीतपणे वाचकांच्या समोर येतात. त्यांच्या कादंबऱ्यांवरचे चित्रपटही प्रसिद्ध झाले आहेत. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्षपद त्यांनी भूषवलं होतं.

पाचोळा या कादंबरीसाठी तसंच मळणी या कथासंग्रहासाठी राज्यशासनाचा उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीचा पुरस्कार देऊन त्यांना गौरवण्यात आलं होतं. गेल्या आठवड्यात राज्य शासनानं विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार ही बोराडे यांना जाहीर केला होता. बोराडे यांच्या पार्थिव देहावर आज संध्याकाळी छत्रपती संभाजीनगर इथं अंत्यसंस्कार होणार आहेत.

बोराडे यांच्या निधनाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी शोक व्यक्त केला आहे. ग्रामीण साहित्य चळवळीचा बिनीचा शिलेदार हरपला असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या शोक संदेशात म्हटलं आहे.

बोराडे यांच्या निधनानं सिद्धहस्त लेखक आणि प्रतिभावान साहित्यिक हरपल्याची भावना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केली. बोराडे यांच्या जाण्यानं साहित्यातली शहरी आणि ग्रामीण भागाची नाळ तुटली असल्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. रा.रं.बोराडे यांच्या निधनाने मराठी साहित्याची मोठी हानी झाली असल्याचं मराठी भाषा आणि उद्योग मंत्री उदय सामंत यांनी म्हटलं आहे.

**//<><><><><><>//**